
# महात्मा फुले
## चिंतन आणि चर्चा

• संपादक •

डॉ. भगवान डोंगरे
डॉ. गोवर्धन मुळक



## ७२

# महात्मा फुले यांच्या स्त्रीविषयक विचार आणि कार्याचे समाजशास्त्रीय अध्ययन


**प्रा.डॉ. तंगलवाड दत्ता माधवराव**

सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख

कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी, ता.गेवराई, जि.बीड.


**प्रस्तावना :-**

**भारतीय** समाजाच्या इतिहासातील आधुनिक कालखंड म्हणजे समाजप्रबोधनाचा काळ होय. समाज प्रबोधनातून भारतीय समाजात मानवी मूल्यांची जोपासंना झाली. व्यक्तीवाद, मानवतावाद, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे शब्द कानावर पडणे अशक्यप्राय स्थिती या देशामध्ये १८ व्या शतकाच्या पूर्वाधापर्यंत होती. यास्थितीमध्ये ग्रामीण जीवनात अजूनही फारसा बदल झालेला दिसून येत नाही. स्त्री दलित, आदिवासी, भटके यांचे जीवन अंधकारमय झालेले होते. अज्ञान, दारिद्र्य, निरक्षरता, आर्थिक विषमता आणि सामाजिक विषमता पराकोटीला पोहचलेली होती. क्षणोक्षणी सामान्य माणसाला जीवन जगणे अशक्यप्राय झालेले होते. त्यामध्ये बदल घडवुन आणुन सामाजिक जीवनात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. तत्कालीन ब्राम्हण जाती व्यवस्थेचे कवच मोडून माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी निर्माण करुन दिली. यामध्ये राजाराम मोहन रॉय, फुले-शाहू-आंबेडकर यांचे नाव अग्रगण्य घेतले जाते. या समाजसुधारकांनी महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील सामाजिक परिवर्तन घडवुन आणण्यासाठी मोठमोठया चळवळी निर्माण करुन भारतीय समाजात असलेल्या अनेक अनिष्ठ चाली, रिती, प्रथा परंपरा नष्ट करण्यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न केला. समाजप्रबोधनाच्या चळवळीत कार्य करणाऱ्या अनेक महान समाजसुधारकांपैकी एक म्हणजे महात्मा फुले होते. मराठी काव्याचे आद्यजनक, आद्यशिक्षिका घडविण्याचे मोलाचे कार्य आपल्याच पत्नीला शिक्षण शिकवुन महात्मा फुले यांनी केले म्हणून प्रस्तुत संशोधनात महात्मा फुले यांच्या स्त्रीविषयक विचार व कार्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**समस्या सुत्रण :-** अर्वाचीन कालखंडातील भारताच्या सामाजिक जडणघडणीत ज्या अनेक महान स्त्री-पुरुषांनी योगदान दिले व समाजाची विस्कळीत झालेली घडी सुरळीत करण्यासाठी कार्य केले. वैदिक काळात निर्माण झालेला जातीभेद, वर्णनभेद, वेद उपनिषीदामध्ये असलेल्रे स्त्रियांचे दुय्यम स्थान यांच्यावर प्रखर हल्ला चढवून स्त्री जीवनाची अनेक सामाजिक बंधनातुन मुक्तता करण्यासाठी महात्मा फुले केलेल्या योगदानाचा आढावा या लघु शोध प्रबंधामध्ये घेण्यात आलेला आहे.

**संशोधन विधान :- 'महात्मा फुले यांच्या स्त्री विषयक विचार आणि कार्याचे समाजशास्त्रीय अध्ययन'** या विषयाच्या अनुषंगाने अधुनिक कालखंडातील सामाजिक समतेचा लढा उभारणाऱ्या महान विभुतीपैकी महात्मा फुले यांच्या कार्यांचा आढावा घेतला आहे.

**संशोधन पद्धती :-** कोणत्याही सामाजिक संशोधनात समस्याचे अध्ययन करण्यासाठी समस्या स्त्री संशोधन पद्धतीच्या आधारे करावे लागते. यासाठी प्रस्तुत संशोधनात विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाची क्षेत्रमर्यादा :-** संशोधन कार्यात वस्तुनिष्ठ तथ्य संकलन करुन निष्कर्षाप्रत जाण्यासाठी संशोधनातील क्षेत्रमर्यादा निश्चीत करावी लागते म्हणून या संशोधनात महात्मा फुले यांच्या फक्त स्त्रीविषयक विचार आणि कार्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे म्हणजेच महात्मा फुले यांचे स्त्रीविषयक विचार व कार्य ही या संशोधनाची क्षेत्र मर्यादा आहे.

असणाऱ्या लोकांना जिंकून त्यांना दास बनवले व क्रुरतेने छळले. स्वहिताला अनुलक्षून बनावट ग्रंथांच्या आधारे ते स्वतःला ईश्वरापेक्षा श्रेष्ठ भासवणाऱ्या ब्राम्हणांवर कडाडून टिका केली. ब्राम्हणांनी निर्माण केलेल्या खोटया ग्रंथांच्या आधारे भारतीय समाजात अंधश्रद्धा पसरवून अज्ञानी व निरक्षर लोकांच्यामनात प्रचंड गोंधळ निर्माण केला आणि भारतीय समाजातील सर्व जाती धर्मातील लोकांना लुटण्याचे कार्य ब्राम्हणांनी केले. ब्राम्हणांच्या विचार आणि कार्यामुळेच भारतीय समाजातील स्त्रियांना अनेक हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले. भारतीय समाजातील प्राचीन काळी महिलांचे असलेली सामाजिक प्रतिष्ठा पूर्णपणे लयास गेली. त्यांना हालाखीचे जीवन जगावे लागले. अनेक प्रकारचे अन्याय, अत्याचार महिलांवर सातत्याने होत राहिले आणि नंतरच्या काळात त्या पुन्हा वाढच होत राहिली. ईश्वराने जर माणसाची निर्मीती केली असेल तर सर्वांना समानहक्क आणि अधिकार दिलेच पाहिजे. सृष्टीतील सर्व वस्तूंचा सारखा उपभोग घेण्याची सर्वांना समानसंधी ईश्वराने दिलेली असेल पण भटांनी खोट्या ग्रंथाच्या आधारे आपण देवापेक्षा श्रेष्ठ असल्याचे भासवून स्त्री, शुद्रातीशूद्र यांची फसवणुक करुन लूट केली म्हणून त्यांच्या प्रबोधनाचा जणू महात्मा फुले यांनी वीडाच उचललेला होता. महात्मा फुले म्हणतात, "सर्व प्राण्यात मानव श्रेष्ठ प्राणी आहे आणि मानवात स्त्री श्रेष्ठ आहे म्हणून त्यांनी मनुस्मृती आणि ब्राम्हणग्रंथ यामध्ये स्त्री शिक्षणाला केलेला विरोध झुगारुन, स्वतःच्या पत्नीला स्वतःच शिकवण्यास सुरू वात केली. आज भारतीय स्त्रीशिक्षणाच्या नवयुगाचा प्रारंभ होय. ते म्हणतात, स्त्री शिवाय पुरुषांच्या जीवनाला पुर्णत्व नाही. समाजाचे सातत्य स्त्रीच्या तागावर अवलंबुन आहे. माता, भगिनी, पत्नी, प्रेयसी, मुलगी अशा अनेक भूमिकेत स्त्री पुरुषांच्या जीवनात येते, पण पुरुषांनी तिला कधीच सन्मानाने जगू दिले नाही. सर्व स्त्रीयांचे सुख सारखे असले तरी दुःख मात्र एकमेकांपेक्षा वेगवेगळी आहेत. केवळ एखादी स्त्री देशाची राष्ट्रपती, पंतप्रधान, आय.ए.एस., आय.पी.एस. अधिकारी झाली म्हणजे देशातील सर्व स्त्रियांचे जीवनातील दुःख नष्ट झाले असे म्हणता येत नाही. उच्च वर्णीयांपासून ते तळागाळातील सर्व स्त्रियांचे जीवनातील अंधकार दूर झाला पाहिजे यासाठी स्त्रीशिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही असे ठाम मत महात्मा फुले यांनी मांडले.

**१. मुलींच्या शिक्षणासाठी शाळेची स्थापना :-** महात्मा फुले यांच्या सार्वजनीक कार्यांची सुरू वातच शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारापासून झाली असे म्हटले जाते. स्त्री, शूद्रादी अतीशूद्र यांना शिक्षण दिल्याशिवाय समाज परिवर्तन नाही म्हणून त्यांनी शिक्षणाला पाहिले प्राधान्य दिले. एक स्त्री शिकली म्हणजे पुर्ण घर साक्षर करते, म्हणून त्यांनी प्रथम स्त्रीशिक्षणाला प्राधान्य दिले. पुण्यातील काकासाहेब भिडेंच्या वाडयात १८४८ च्या ऑगस्ट महिन्यात मुलींची पहिली शाळा स्थापन केली. हंटर कमिशनला निवेदन देऊन १२ वर्षाच्या आतील मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा आग्रह धरला. मुलींच्या शिक्षणाला समाजातील कर्मठ ब्राम्हण लोकांनी केलेला वाढता विरोध पाहून त्यांनी स्वतःच्या पत्नीला शिक्षण शिकवून त्या शाळेत शिक्षक बनवले. सावित्रीमाईने चिखल, शेणाचा-खातीचा प्रहार सहन करुन ज्ञानदानाचे कार्य केले. त्या शाळेत चार ब्राम्हण, एक मराठा व एक धनगर अशा एकूण ६ मुलींवर महात्मा फुले यांनी देशातील मुलींची पहिली शाळा सुरूवात केली पण काही अडचणींमुळे ही शाळा बंद पडल्यानंतर पुन्हा ३ जुलै १८९१ अण्णासाहेब चिपळुणकर यांच्या वाडयात नवीन शाळा सुरू केली. समाजकंठकांच्या विरोधामुळे लोक मुलींना शाळेत पोत्यात बांधुन आणुन सोडत असत. शाळेचे दारे, खिडक्या बंद करुन ज्ञानदानाचे कार्य सावित्रीमाईने केले. या मानवमुक्तीच्या लढयात सावित्रीमाईने मरेपर्यंत महात्मा फुले यांची साथ सोडली नाही. शेकडो वर्षांपासुन धर्मांच्या नावाखाली दबलेला अवाज पुन्हा एकदा बुलंद करण्याचे कार्य महात्मा जोतीबा फुले यांनी केले म्हणून आजची स्त्री मोकळा श्वास घेताना आपणांस दिसून येते.

**सतीप्रथेला विरोध :-** राजाराम मोहनरॉय यांनी लॉर्ड विल्यम बेटींग यांच्या मदतीने १८३९ रोजी सतीची चाल बंद करण्यासाठी कायदा केला असला तरी बंगालसह सर्व देशातील ही प्रथा नष्ट झालेली नव्हती. सर्वत्र सती प्रथेचे स्तोम माजलेले होते. सती प्रथा हा भारतीय समाजाला लागलेला कलंक असून तो स्त्रियांवर होणारा मोठा अन्याय आहे. तो अन्याय नष्ट करण्यासाठी महात्मा फुले यांनी समाजातील सर्व स्तरातील लोकांचे समाजप्रबोधन घडून आणले व सामाजिक परिवर्तनाची ज्योत पेटवली. या पवित्र कार्यात सावित्रीमाई फुले यांचे मोलाचे योगदान आहे. एवढचे नव्हे तर महात्मा फुले यांच्या निधनानंतर

**नमुना निवड :-** महात्मा फुले यांचे आधुनिक भारताच्या जडणघडणीत अनन्यसाधारण असे योगदान आहे म्हणून या लघुशोधनिबंधाची मर्यादा महात्मा फुले यांचे विचार व कार्य ही आहे. यासाठी बहुतेक नमुना निवड पद्धतीच्या आधारे महात्मा फुले यांच्या स्त्री विषयक विचार व कार्याची निवड करुन अध्ययन करण्यात आले.

**तथ्य संकलनाची साधने :-** प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी संदभ्र ग्रंथ, नियतकालिके, पुस्तके, मासिके यांचा आढावा घेतला.

**संशोधनाची उद्दिष्टे :-** उद्दिष्टांच्या मांडणीमुळे संशोधन कार्याला निश्चीत दिशा प्राप्त होते म्हणून प्रस्तुत संशोधनात पुढील उद्दिष्टांची मांडणी करण्यात आली.

१. महात्मा फुले यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेणे .

२. महात्मा फुले यांचे स्त्रीयांच्या उद्धारातील योगदान अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :-** गृहितकृत्याच्या मांडणीमुळे संशोधन कार्याला निश्चीत दिशा प्राप्त होते म्हणून गृहीतकृत्याला संशोधन कार्याचा कार्यवाहक विचार असे म्हणतात म्हणून या संशोधनात पुढील गृहितकांची मांडणी करण्यात आली आहे.

१. आधुनिक भारतीय स्त्रीयांच्या जडणघडणीत महात्मा फुलेंचे मोलाचे योगदान आहे.

२. स्त्रीया, दीन, दलित, अस्पृश्य यांच्या उद्धारासाठी महात्मा फुले यांनी आपले संपुर्ण आयुष्य खर्ची घातले.

**माहितीचे विश्लेषण :-** मानवमुक्तीचे संघर्षयात्री आद्यलोकशिक्षक, दलित, क्षुद्रातीक्षुद्र बांधवांच्या उद्धारासाठी जन्मभर निरपेक्ष कार्य करणारे आद्यसमाज क्रांतिकारक, सामाजिक समतेचे खंदे पुरस्कर्ते अस्पृश्यांचे उद्धारक, स्त्रीयांचे उद्धारक, मराठी लेखक, विचारवंत, समाजसुधारक, शेतकरी व बहुजनांचे नायक महात्मा जोतीबा फुले यांचा जन्म ११/०४/१८२७ रोजी महाराष्ट्रातील पुणे या नामवंत शहरामध्ये झाला असला तरी त्यांचे मुळचे गाव सातारा जिल्हयातील कटगुण हे होते पण त्यांचे आजोबा हे व्यवसायासाठी पुण्यामध्ये स्थायिक झाले. त्यांचे मुळ अडनाव गोऱ्हे हे होते. परंतु पेशव्यांच्या दरबारी फुले पुरविण्याचा व्यवसाय त्यांचे आजोबा करत म्हणून त्यांचे गोऱ्हे हे आडनाव काळाच्या ओघात मागे पडून त्यांच्या आजोबांना फुले या नावाने ओळखले जाऊ लागले. महात्मा फुले यांचा जन्मानंतर केवळ एक वर्षाच्या आत त्यांच्या आईचे दुर्दैवी निधन झाले व त्यांचा पुढचा सगळा सांभाळ त्यांची मावस बहिण सगुणा क्षीरसागर नावाच्या स्त्रीने केले. महात्मा फुले यांचे वडील अशिक्षित होते म्हणून त्यांनी आपल्या मुलाला खूप शिकवण्याचा मानस मनात ठेवुन शाळेत प्रवेश केला पण कौटुंबीक अडचणींमुळे १८३४ ते १८३८ या कालखंडात त्यांच्या शिक्षणात खंड पडला. ऊर्दु फारशी विद्वान गफ्फारबेग मुन्शी व ख्रिस्त धर्मोपदेशक लिजीट यांच्या आग्रहामुळे तीन वर्षाच्या खंडानंतर पुन्हा महात्मा फुले यांनी स्कॉटीश मिशनच्या स्कुलमध्ये प्रवेश घेऊन शिक्षणाला सुरूवात केली. इ.स. १८४१ ते १८४७ या कालावधीत हायस्कुलचे शिक्षण पुर्ण करुन १८४७ मध्ये लहुजी वस्ताद साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली दांडपट्टयाचे शिक्षण घेतले. १८४७ मध्ये त्यांनी वाचलेल्या राईटस ऑफ मॅन या ग्रंथामुळे त्यांच्या जीवनावर प्रचंड प्रभाव पडुन त्यांचे संपूर्ण जीवनच बदलून गेले आणि विस्कळीत झालेली समाजव्यवस्थेची घडी सुरळीत करण्यासाठी नोकरी न करता समाजसुधारणा चळवळीत भाग घेतला.

बहुजन समाजाला अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढून त्यांच्या जीवनात शिक्षणाद्वारे स्वाभीमान जागवणारा पहिला भारतीय महात्मा म्हणून जगाच्या इतिहासात अजरामर राहण्याचे कार्य त्यांनी केले. स्त्री, दलित, शूद्रातिशूद्र बांधवांच्या उद्धारासाठी केलेल्या कार्यामुळे जनतेने त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली व आद्यक्रांतिकारक म्हणून संबोधले जाऊ लागले. कारण नोकरी व पैशाचा हव्यास न बाळगता तळमळीने तळागाळातील माणसासाठी समाजप्रबोधन व समाजसुधारणेचे कार्य करणारे ते कर्ते सुधारक होते. त्यांच्या उक्तीला कृतीची जोड होती म्हणूनच सर्व भारतीय जाती जमातीचे लोक त्यांना आदराने महात्मा असे म्हणतात.

**महात्मा फुले यांचे स्त्रीविषयक विचार आणि कार्य :-**

महात्मा फुले यांनी आपल्या गुलामगिरी ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे, या देशात परकीय देशातुन येऊन मुळचे रहिवासी

सावित्रीमाईनी सती न जाता त्यांचा वसा घेऊन त्यांच कार्य नेटाने पुढे चालवले.

**केशवपण प्रथेला विरोध :-** सतीची प्रथा बंद झालेनंतर भारतातील कर्मठ लोकांनी स्त्रीयांना कुरुप दिसावे म्हणुन त्यांचे डोक्यावरचे केस काढून टाकायला सुरूवात केली. केस हा स्त्रीयांचा दागिना आहेआणि निसर्गाने दिलेली देणगी आहे म्हणुन केशवपण करणे हा मोठा अन्याय आहे म्हणुन त्यांनी नारायण मेघाजी लोखंडे या नाव्ह्याच्या मदतीने या प्रथेविरुद्ध ऐतिहासिक संप घडवुन आणला. २३ मार्च १८९० रोजी सभेत फुले दांपत्यांनी या प्रथेच्या विरोधात ठराव पास केला. पेशवाईच्या अस्तित्वापासुन असलेली ही प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला म्हणून आजच्या विधवा स्त्रीच्या डोक्यावर केस असलेले आपणांस पहावयास मिळते.

**आंतरजातीय विवाहाचे समर्थन :-** स्त्री मुक्तीसाठी फुले दांपत्यांनी आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले, एवढेच नव्हेतर आपल्या यशवंत नावाच्या दत्तक मुलाचा विवाह ज्ञानोबा ससाणे यांची द्वितीय कन्या लक्ष्मीबाई यांच्या लावला हा विवाह म्हणजे आधुनिक भारतातील पहिला आंतरजातीय विवाह आहे.

**बाल विवाहाला विरोध :-** महात्मा फुलेंच्या समकालीनच नव्हेतर उत्तर वैदिक कालखंडापासून भारतामध्ये उदयाला आलेली प्रथा म्हणून बालविवाहाकडे पाहिले जाते. या प्रथमेमुळे स्त्रीजीवन कोमेजून जाते अनेक वेळा बालवयातच मुलींना वैधव्य येते. अनेक स्त्रीयांना वैवाहिक जीवनामध्ये लवकर मातृत्व आल्यामुळे अकाली मृत्यूचे प्रमाण देखील वाढते म्हणुन महात्मा फुले यांनी बालविवाहास विरोध केला कारण वयाच्या ११ व्या वर्षी महात्मा फुले यांचा विवाह सावित्रीबाइ या सात वर्षांच्या मुलीशी झाला होता म्हणून स्त्रीच्या शरीरावर व जीवनावर आणि मनावर होणारे दुरगामी परिणाम महात्मा फुले यांनी जवळून पाहिले होते म्हणुन त्यांनी बालविवाहाला विरोध दर्शविला.

**विधवा विवाहाचे समर्थन :-** पतीच्या निधनानंतर स्त्रीने सती जावे किंवा मरेपर्यंत सन्यासी रहावे आणि पुरुषाने मात्र एकाच वेळी अनेक स्त्रीयांशी विवाह करावा एवढेच नव्हे तर आजोबाच्या वयाच्या पुरुषाशी मुलींचे विजोड विवाह करणे याबद्दल फुलेंना प्रचंड चीड होती. असे पुरुष लवकर मरण पावल्यास बालवयातच वैधव्य नशिबाला येते म्हणून अशा मुलींच्या पुर्नविवाहाचे समर्थन महात्मा फुले यांनी केले. १८६४ साली त्यांनी पहिला विधवा विवाह शेवणी जातीतील रघुनाथ जनार्धन व नर्मदा यांचा लावला हा महाराष्ट्रातील पहिला विधवा पुर्नविवाह समजला जातो.

**बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना :-** समाजातील बालवयात वैधव्य आलेल्या मुलींचे प्रमाण हे जास्त होते. अशा कुमारी विधवांचे वाकडे पाऊल पडून गर्भधारणा झाल्यास अशा स्त्रीयांनी आत्महत्या न करता त्यांनी मुलांना जन्म द्यावा म्हणुन बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली, हे बालहत्या प्रतिबंधकगृह आपल्याच घराच्या शेजारी, आपल्याच जागेत १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. माता आणि बाळाचे संरक्षण करण्याचे मोलाचे कार्य फुले दांपत्यांनी केले. याच बालहत्या प्रतिबंधक गृहातील यशवंत हा काशीबाई नावाच्या ब्राम्हण विधवेचा मुलगा असून त्याला दत्तक घेऊन स्वतःच्या पोटच्या मुलाप्रमाणे वाढवले. तोच पुढे डॉ. यशवंतराव फुले म्हणुन ओळखला जाऊ लागला.

**अंधश्रद्धा निर्मुलन :-** भारतीय महिलांवर होणारे अनेक अन्याय, अत्याचाराचे मुळ हे अंधश्रद्धेमध्ये आहे. स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, कर्म- पुर्नजन्म या बाबी समोर करुन ब्राम्हणाने निर्माण केलेल्या सांस्कृतिक व धार्मिक राक्षसामुळे स्त्री जन्मापासुन ते मृत्यूपर्यंत छळली जात होती. या कोंडीतून तिला बाहेर काढण्यासाठी महात्मा फुले यांनी आपल्या लेखणी व वाणीचा उपयोग केला. शिक्षित बाईने केलेल्या स्वयंपाकात आळया होतात ही अंधश्रद्धा मोडण्यासाठी फुलेंनी सर्वप्रथम स्वतःच्या पत्नीस शिक्षण दिले आणि मनुस्मृती, ब्राम्हण ग्रंथ, पुराणे ही कशी अवास्तव आहेत हे लोकांना समजून सांगितले.

**सारांश :-** क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले हे क्रांतीची धगधगती मशाल होते. आपल्या विचार आणि कार्याद्वारे समाज प्रबोधनातुन सामाजिक परिवर्तन घडवुन त्यांनी स्त्री जीवन सुकर करण्याचा प्रयत्न केला म्हणून आजची स्त्री काही प्रमाणात का होईना मोकळा श्वास घेताना दिसून येते. अनेक सामाजिक प्रथेपैकी अनिष्ठ सामाजिक प्रथांवर प्रहार करून जाती व्यवस्था,

अस्पृश्यता, सती प्रथा सारख्या समाजाला कलंक लावणाऱ्या प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. या कार्यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले.

**निष्कर्ष :-**

१. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ पुण्यामध्ये सर्वप्रथम महात्मा फुले यांनी रोवल्यामुळे स्त्री शिक्षणाचे सार्वत्रीकरण होण्यास सुरू वात झाली म्हणून आज अनेक स्त्रिया उच्च विद्या संपादन करून उच्च पदावर स्वार झालेल्या दिसून येतात याचे सर्व श्रेय फुले दांपत्यांना जाते.

२. महात्मा फुले यांनी सतीप्रथा, केशवपण, बालविवाह, जातीभेद, उच्चनिचता या सारख्या प्रथांना विरोध करुन महिलांना सन्मानाने जगण्याची संधी निर्माण करुन दिली.

३. स्त्रीमुक्ती व स्त्रीसन्मानासाठी त्यांनी समाज कंठकांचा रोष पत्कारला, त्यांना आपले घर सोडुन आपल्या प्राणप्रिय वडिलांपासून दूर जावे लागले परंतु ते आपल्या कार्यापासून विचलीत झाले नाहीत.

४. नाभिक लोकांचा संप घडवून केशवपण सारख्या अनिष्ठ प्रथेला छेद देऊन नवीन सामाजिक मूल्य रुजविण्याचा प्रयत्न केला.

५. विधवा विवाहाचे समर्थन व बाल हत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करुन वाकडे पाऊल पडणाऱ्या विधवांना एक सुरक्षा कवच निर्माण करुन नवीन सामाजिक मूल्य रुजविण्याचा प्रयत्न केला.

६. एक आदर्श शिक्षीका, उत्तम प्रशासक, एक आदर्श माता, लेखिका, कवयित्री म्हणून स्वत:च्या पत्नीला जगासमोर उभे केले.

**संदर्भ :-**


१. संपादक हरी नरके, (१९९३), आम्ही पाहिलेले फुले, महात्मा फुले चरित्र साधने, प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई.

२. ज्योती डोईफोडे, (२०१२), समाजशास्त्रीय विचार प्रवाह, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.

३. दा.धो. काचोळे, (१९९९), भारतीय सामाजिक विचारवंत, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

४. चंद्रशेखर गायकवाड, (२०१५), मानवमुक्तीचा संघर्षयात्री, ओम प्रकाशन, अकलुज.

५. गौतम निकम, (२००९), महामानव, अभिनंदन प्रकाशन, अकोला.